मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण समारंभाचे आयोजन : भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले





**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पुर्ण झाल्याबद्दल अमृतमहोत्सव साजरा करण्याचा हा सुवर्णक्षण आहे. आपण सर्व मिळून एकजुटीने कार्य करूया आणि आपले शहर, आपला देश अधिक प्रगत, स्वच्छ आणि हरित बनविण्याचा संकल्प करूया आणि भारतीय संविधानाची मुल्ये जोपासत आपल्या देशाला अग्रेसर बनविण्यासाठी आपण कटिबद्ध होऊया, असे प्रतिपादन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.

भारताच्या प्रजासत्ताक दिनाचा ७५ वा वर्धापन दिन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी शुभेच्छा देताना ते बोलत होते. तत्पुर्वी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

या राष्ट्रध्वजारोहण समारंभास आमदार उमा खापरे, माजी महापौर योगेश बहल, माजी उपमहापौर राजू मिसाळ, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा वित्त संचालक प्रविण जैन, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य अभियंता प्रमोद ओभांसे, संजय कुलकर्णी, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, देवन्ना गट्टूवार, संजय खाबडे, विजय काळे, बाबासाहेब गलबले, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, उप आयुक्त मनोज लोणकर, संदीप खोत, अण्णा बोदडे, पंकज पाटील, माजी नगरसदस्य गोविंद पानसरे, नामदेव ढाके, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अविनाश शिंदे, उमेश ढाकणे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संविधान प्रास्ताविकेचे वाचन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

**महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या भाषणातील सारांश –**

विविधतेने नटलेल्या आपल्या देशाने गेल्या ७५ वर्षात निरंतर विकासाच्या दिशेने वाटचाल केली आहे. या काळात औद्योगिकनगरी म्हणून ओळखल्या जाणा-या पिंपरी चिंचवड शहराने देखील अल्पावधीच विकासाच्या दिशेने झेप घेतली आहे. देशातील महत्वाच्या शहरांमध्ये पिंपरी चिंचवड शहराचे नाव प्रामुख्याने घेतले जाते, ही आपल्या शहराच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रत्येक उपक्रमांमध्ये शहरातील सर्व घटकांचा सहभाग महत्वाची भूमिका बजावत असून नागरिकांना उत्तम आणि दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेची यंत्रणा अविरतपणे कार्यरत आहे. पिंपरी चिंचवड शहराला गौरवशाली इतिहास आणि संतांची परंपरा लाभलेली आहे. ही परंपरा अबाधित ठेऊन शहराला स्वच्छ व सुंदर तसेच राहण्यायोग्य शहर बनविण्यासाठी महापालिकेची वाटचाल यशस्वी ठरत आहे. येत्या काळात देशातील स्वच्छ व सुंदर तसेच राहण्यायोग्य शहर म्हणून पिंपरी चिंचवड शहराचा नामोल्लेख प्रामुख्याने केला जाईल असा विश्वास वाटतो.

'कटिबद्धा जनहिताय' या महापालिकेच्या ब्रीदवाक्यानुसार नागरिकांना सेवा, सुविधा पुरविताना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत प्रशासकीय सेवा सुविधा अधिक गतिमान करण्याचा महापालिकेचा प्रयत्न असून महापालिकेचे कामकाज कागद विरहीत करण्यासाठी "डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टीम" प्रणालीचा महापालिकेच्या कामकाजात समावेश करण्यात येणार आहे. तसेच ई- गव्हर्नंस निर्देशांकामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेने स्वतःचे स्थान निर्माण केले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू

## पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत




**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात कलमी कार्यक्रम राबवण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला. उपक्रमाचे उद्दिष्ट नागरिकांना जलद, पारदर्शक आणि प्रभावी सेवा उपलब्ध करून देणे, तसेच प्रशासनातील कार्यक्षमता आणि स्वच्छता वाढवणे हे आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कंबर कसली असून, विविध उपक्रम हाती घेतले आहेत.

**सात कलमी कार्यक्रमाची उद्दिष्टे :**

मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या सात कलमी कार्यक्रमात नागरी सेवांचे सुलभीकरण, कार्यक्षम प्रशासन, स्वच्छता मोहीम, औद्योगिक संवाद व प्रलंबित प्रकरणांचे निवारणावर भर दिला आहे. समस्या जलदगतीने सोडवण्यासाठी तसेच प्रशासन अधिक पारदर्शक बनवण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.

नागरी सेवांची सुलभता : नागरिकांसाठी विविध सरकारी सेवा सुलभ करून त्या लोकाभिमुख बनवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

प्रशासनात सुधारणा : शासकीय यंत्रणेतील कार्यक्षमतेत वाढ करून सेवा जलद पुरवण्यावर भर दिला जाणार आहे.

जलद आणि पारदर्शक सेवा : नागरिकांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रभावी उपाययोजना दिल्या जातील.

स्वच्छता मोहिमा : सरकारी कार्यालये आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ आणि सुरक्षित बनवण्याचा हेतू आहे. प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे : अपघात मृत्यू प्रकरणे, गुन्हेगारी तक्रारी, अन्य प्रलंबित प्रकरणे वेळेत निकाली काढली जातील.

औद्योगिक संवाद : औद्योगिक क्षेत्राशी संवाद साधून गुंतवणूकदारांचे प्रश्न सोडवले जातील. अंतर्गत सुसूत्रता : शासकीय कार्यालयांमध्ये कार्यक्षमतेसाठी सुसूत्रता वाढवली जाईल.

अंमलबजावणीसाठी पोलिस विभागाचे उपक्रम: डिजिटल सेवांचा वापर : पिंपरी-चिंचवड पोलिसांनी नागरिकांना डिजिटल सेवा सहज आणि जलद उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. कार्यालयाच्या वेबसाईटचा अद्ययावतीकरण करण्यात आला असून, माहिती अधिकारातील माहिती सहज उपलब्ध केली जाईल. ऑनलाईन तक्रार नोंदणीसाठी नवीन पोर्टल विकसित केले आहे.

जलद तक्रार निवारण : तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष उभारण्याचे काम करण्यात आले आहे. या कक्षाचे मुख्य उद्दिष्ट नागरिकांच्या समस्यांवर तत्काळ कार्यवाही करून त्यांना समाधान मिळवून देणे आहे. स्वच्छता मोहिमेवर भर : पिंपरी-चिंचवडमधील सर्व पोलिस ठाण्यांमध्ये स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. परिसर स्वच्छ करण्याबरोबरच, जुन्या नोंदींचे डिजिटलायझेशन, अनउपयुक्त वस्तूंचा निचरा व सुरक्षित वातावरण निर्माण करणे यावर भर दिला जात आहे.

प्रलंबित प्रकरणांचा निपटारा : मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार, गुन्हेगारी प्रकरणे, अपघात मृत्यू प्रकरणे आणि इतर प्रलंबित प्रकरणे वेळेत निकाली काढण्यासाठी पोलिस विभागाने विशेष पथके तयार केली आहेत. प्रत्येक प्रकरणाचा आढावा घेऊन निश्चित वेळेत निर्णय घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# गुइलेन बॅरी सिंड्रोम आजाराचे मिळणार मोफत उपचार : अजित पवारांची घोषणा

## पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर अजित पवार यांनी संवाद साधला

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून गुइलेन बॅरी सिंड्रोम या दुर्मिळ आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. आतापर्यंत या आजाराने दोन जण दगावले आहेत. आता रुग्णसंख्या ७३ वर जाऊन पोहचली आहे. काही रुग्ण हे व्हेंटिलेटरवरती असून या आजाराचा खर्च देखील मोठा आहे. यामुळे या आजारावरती मोफत उपचार मिळावेत अशी मागणी केली जात होती, अखेर उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी या आजारावर मोफत उपचार केले जाणार असल्याची घोषणा केली आहे. यामुळे पुणेकरांना दिलासा मिळाला आहे.

पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. गुइलेन बॅरी सिंड्रोम आजारावर पुण्यातील कमला नेहरु रुग्णालयात मोफत उपाचार करण्यात येणार आहेत. याविषयीच्या सूचना महापालिकेच्या आयुक्तांना दिल्या असल्याची माहिती पवार यांनी यावेळी बोलतान दिली. तसेच नागरिकांनी घाबरून जावू नये, काळजी घ्यावी असे आवाहन देखील त्यांनी नागरिकांना केले आहे.



### नेमकं काय म्हणाले अजित पवार?

» अजित पवार यांनी सांगितलं की, "या आजाराबाबत नागरिकांनी मला दहा लाखांचं बिल दाखवलं. ते मी महापालिका आयुक्तांना दाखवलंय. त्यानंतर आता या आजाराबाबत असा निर्णय घेण्यात आलाय की, पिंपरी चिंचवड येथील रुग्णांना वायसीएम रुग्णालयात, तर पुणे शहरातील रुग्णांना कमला नेहरू रुग्णालय येथे मोफत उपचार देण्यात येणार आहे." तसंच उद्या मुंबईत गेल्यावर ग्रामीण भागातील रुग्णांसाठी पुण्यातील ससून हॉस्पिटल इथं मोफत उपचार करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचंही ते म्हणाले.

### पुरस्कारार्थींचे अभिनंदन

» अनेकांनी स्वातंत्र्यासाठी त्याग आणि बलिदान दिले. 76 व्या प्रजासत्ताक दिनाच्या सगळ्यांना हार्दिक शुभेच्छा. 75 वर्षात प्रत्येक संकटाला समोर जाणारे काम देशवासीयांनी केलं, संपूर्ण देश एक आहे ही, भावना आपण मजबूत केली. हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाची ताकद आहे. आपली लोकशाही सुरक्षित राहिली त्याचे श्रेय बाबासाहेबांनी दिलेल्या घटनेला आहे. केंद्र सरकारने काल पुरस्कार जाहीर केले. हे पुरस्कार मिळालेल्या सगळ्यांचे मी अभिनंदन करतो, असेही अजित पवारांनी म्हटले आहे.

शरद पवारांविषयी अजित पवार म्हणाले राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची तब्येत अचानक बिघडल्यामुळं त्यांना डॉक्टरांनी चार दिवस विश्रांतीचा सल्ला दिला आहे. याबाबत अजित पवार यांना विचारलं असता ते म्हणाले, "व्हीएसआयच्या बैठकीतदेखील साहेबांची तब्येत थोडीशी खराब होती. साहेब मुंबईला गेले आहेत. डॉक्टरांनी त्यांना चार दिवसांची विश्रांती घ्यायला सांगितलंय."

# न्यायालयात शिक्षा होण्याचे प्रमाण फक्त 13 टक्केच

## सत्र न्यायालयात 13 टक्के, तर प्रथमवर्ग न्यायालयात 18 टक्के प्रकरणांतच शिक्षा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात दरवर्षी दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या हजारोंने वाढत आहे. जिल्ह्यातील न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्यादेखील ७ लाखांच्या वर गेली आहे. मात्र, गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण घटल्याचे चित्र आहे.

२०२४ मध्ये सत्र न्यायालयात शिक्षेचे प्रमाण अवघे १३ टक्के असून, मागील वर्षीच्या तुलनेत यात घट झाली आहे. २०२३ मध्ये हे प्रमाण १७ टक्के होते. तर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांकडून सुनावण्यात येणाऱ्या खटल्यातील शिक्षेचे प्रमाणही १८ टक्केच आहे. गेल्या वर्षी हे प्रमाण अवघे ४ टक्के होते. प्रथमवर्ग न्यायालयात ३ वर्षांपर्यंत शिक्षा असलेले खटले चालतात, तर सत्र न्यायालयाता जन्मठेप, मृत्युदंड देण्याचा अधिकार असतो. त्यामुळे गंभीर गुन्ह्यांबाबत शिक्षेचे प्रमाण वाढणे गरजेचे आहे.



शहरात गुन्ह्यांची संख्या वाढत असून, पोलीस आरोपींना पकडतही आहेत. मात्र, न्यायालयीन प्रक्रिया शिक्षा सुनावण्यात अपयशी ठरत आहे. २०२१ मध्ये सत्र न्यायालयात शिक्षेचा दर २६ टक्के होता, तर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांकडून सुनावलेल्या शिक्षेचा दर ६५ टक्के होता. या दोन्हींत घट झाली आहे. शिक्षेचे दर वाढविण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

अनेकदा फिर्यादी आणि साक्षीदार न्यायालयीन दिरंगाईने कंटाळून केसकडे लक्ष देणे सोडून देतात. महिलांच्या, बाल लैंगिक अत्याचाराच्या केस जलतगती न्यायालयात चालविण्यात याव्यात, असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. मात्र, त्यासाठी तपास यंत्रणांचा हवा तसा प्रतिसाद मिळत नाही. खटला लांबला, तर साक्षीदार फितुरीचे प्रमाण वाढते. काही वेळा शहर सोडून गेलेले साक्षीदार पुन्हा सापडत नाहीत. कधी काही तांत्रिक कारणामुळेही आरोपींची निर्दोष मुक्तता होते. तांत्रिक व कायदेशीर बाबींतील त्रुटीमुळे दोषरोपसिद्धीचे प्रमाण कमी आहे.

### सत्र न्यायालयातील शिक्षेचे प्रमाण

| वर्ष | शिक्षेचे प्रमाण (टक्के) |
|---|---|
| » २०२२ | १५ |
| » २०२३ | १७ |
| » २०२४ | १३ |

### प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयातील शिक्षेचे प्रमाण

| वर्ष | शिक्षेचे प्रमाण (टक्के) |
|---|---|
| » २०२२ | १० |
| » २०२३ | ०४ |
| » २०२४ | १८ |

> मुख्यत्वे विलंब हे शिक्षेचे प्रमाण कमी असण्याचे कारण आहे. शिक्षा वाढविण्यासाठी वेळेत दोषारोपपत्र दाखल झाले पाहिजे. वेळेत खटले चालले पाहिजेत. म्हणजे पुराव्यांवर कोणताही परिणाम होणार नाही.
> - ऍड. खंडेराव टाचले, फौजदारी वकील

वर्षानुवर्षे खटला सुरू राहिल्यामुळे फिर्यादी आणि साथीदारांना नाहक त्रास सहन करावा लागतो, तसेच आरोपींचा बचाव केल्याचा आरोप किंवा टीका होऊ नये, यासाठी सबळ पुराव्याअभावी तपासी अधिकाऱ्यांकडून बऱ्याच प्रकरणांमध्ये दोषारोपपत्र दाखल केले जाते. काही प्रकरणांमध्ये तपास अपुरा असतानाही अर्धवट दोषारोपपत्र दाखल केले जाते.

# अवजड वाहने ठरत आहेत 'काळ'!

## अजवड वाहनांची बेशिस्त वाहतूक, चालकांचा बेदरकारपणा आणि प्रशासनाचा सुस्त कारभार यामुळे ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील अवजड वाहनांच्या वाढत्या अपघातांमुळे रस्ते अपघातांची समस्या गंभीर बनली आहे. या अपघातांमुळे अनेकांना प्राण गमवावा लागत असून, दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अजवड वाहनांची बेशिस्त वाहतूक, चालकांचा बेदरकारपणा आणि प्रशासनाचा सुस्त कारभार यामुळे ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

**औद्योगिक क्षेत्रातील समस्या**

औद्योगिक क्षेत्रामध्ये अवजड वाहनांची वाहतूक अपरिहार्य आहे. मात्र, यासाठी निश्चित वेळ आणि रस्त्यांचे नियोजन केलेले नाही. परिणामी, या वाहनांमुळे रहदारीतील अन्य वाहनचालक आणि पादचारी यांच्यासाठी अपघाताचा धोका वाढत असल्याचे जाणकार सांगतात.

**अनेकांनी गमावले जीव**

मागील काही महिन्यांतील घटनांकडे पाहता, डंपर आणि अन्य अवजड वाहनांमुळे मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली आहे. वाघोली येथील भरधाव डंपरने पदपथावर झोपलेल्या नऊ जणांना चिरडल्याची घटना अद्याप ताजी आहे. हिंजवडी, चाकण, तळवडे, महाळुंगे, निगडी आणि अन्य औद्योगिक परिसरातही अशीच परिस्थिती असून, नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.



### वाहतूक नियमांचे उल्लंघन

» वाहतूक पोलिसांकडून अवजड वाहन- चालकांवर मोठ्या प्रमाणावर दंडात्मक कारवाई केली जाते. मागील वर्षभरात वाहनांवर दंड लावून कोट्यवधी रुपयांचा दंड आकारण्यात आला. मात्र, केवळ आर्थिक दंडाचा काहीही परिणाम होताना दिसत नाही. या वाहनचालकांना नियम पाळण्यासाठी आणि जबाबदारीने वाहन चालवण्यासाठी सक्षम उपाययोजना करण्याची गरज आहे.

सन 2025 मध्ये प्रवेश बंदी असलेल्या ठिकाणांवरून प्रतिबंधित वेळेमध्ये, सकाळी 8 ते 11 आणि संध्याकाळी 5 ते 9, जड-अवजड वाहनांनी प्रवेश केल्यास कडक कारवाई करण्यात येईल. वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी आणि अपघातांची संख्या कमी करण्यासाठी प्रशासनाने ही योजना आखली असल्याचे पोलिस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या वाहनचालकांना नियम पाळण्यासाठी आणि जबाबदारीने वाहन चालवण्यासाठी सक्षम उपाययोजना करण्याची गरज आहे.

### अवजड वाहनांवर कारवाई

» सन 2024 मध्ये वाहतूक पोलिसांनी एकूण 37 हजार जड अवजड वाहनांवर कारवाई केली असून, 4 कोटी 23 लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. सन 2025 मध्ये प्रवेश बंदी असलेल्या ठिकाणांवरून प्रतिबंधित वेळेमध्ये, म्हणजे सकाळी 8 ते 11 आणि संध्याकाळी 5 ते 9, जड-अवजड वाहनांनी प्रवेश केल्यास कडक कारवाई करण्यात येईल. वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी आणि अपघातांची संख्या कमी करण्यासाठी प्रशासनाने ही योजना आखली असल्याचे पोलिस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

### बेदरकार वाहनचालक

» अवजड वाहने, विशेषतः डंपर, ट्रक आणि कंटेनर हे शहरातील अंतर्गत रस्त्यांवर सर्रासपणे धावताना दिसतात. नियमांनुसार शहराच्या अंतर्गत रस्त्यांवर या वाहनांना बंदी असतानाही, रात्रीच्याच नव्हे, तर दिवसभरही ही वाहने शहरभर बेधडकपणे वाहतूक करतात. या वाहनांचे बेदरकार चालक वेगमर्यादा आणि नियमांकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे अपघातांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे.

> अवजड वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आम्ही सातत्याने कारवाई करत आहोत. मागील वर्षभरात सुमारे 37 हजार वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. मात्र, वाहनचालक आणि वाहनमालकांनी स्वतःहून नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. अपघात टाळण्यासाठी कठोर कारवाईसह जनजागृतीही सुरू आहे.
>
> - बापू बांगर, पोलिस उपायुक्त, वाहतूक विभाग

# पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय परिसरात विकतचा कचरा

## अवजड, प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या फिटनेस तपासणीपूर्वी संबंधित वाहनांवर रिफ्लेक्टर असणे बंधनकारक आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

अवजड, प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या फिटनेस तपासणीपूर्वी संबंधित वाहनांवर रिफ्लेक्टर असणे बंधनकारक आहे. योग्य ठिकाणी रिफ्लेक्टर असल्याखेरीज अशी वाहने रस्त्यांवर चालवण्यास संमती दिली जात नाही.

अवजड, प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या फिटनेस तपासणीपूर्वी संबंधित वाहनांवर रिफ्लेक्टर असणे बंधनकारक आहे. योग्य ठिकाणी रिफ्लेक्टर असल्याखेरीज अशी वाहने रस्त्यांवर चालवण्यास संमती दिली जात नाही. याखेरीज रिफ्लेक्टर नसेल तर एक हजार रुपयांचा दंड आकारला जातो. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) तपासणीसाठी येणाऱ्या वाहनचालकांकडून भीती दाखवून ३० रुपये फूट दराने रिफ्लेक्टरची विक्री होत आहे. वाहनचालकांना लुबाडणारे रिफ्लेक्टर विक्रेते हा कचरा कार्यालयातच सोडून जात असल्याने आरटीओला या विकतच्या कचऱ्याची स्वच्छता करण्यासाठी विशेष यातायात करावी आगत आहे.



वाहनांच्या पुढे, मागे तसेच बाजूने वेगवेगळ्या रंगांचे रिफ्लेक्टर लावावे लागतात. अन्यथा, एक हजार रुपयांचा दंड आकारला जातो. आरटीओमध्ये ४ प्रकारच्या रिफ्लेक्टरची योग्यता तपासून तेथेच रिफ्लेक्टर चिकटवण्यात येतात. त्यानंतर रिफ्लेक्टरचा कचरा तिथेच टाकला जातो. आरटीओच्या तिन्ही बाजूला असलेल्या मैदानात या कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. मात्र, या विक्रेत्यांवर कोणाचेही नियंत्रण नसल्याने हा कचरा महापालिकेच्या आरोग्य विभागासाठी डोकेदुखी ठरू लागला आहे. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने प्रवासी, अवजड आणि छोट्या वाहतूक वाहनांची फिटनेस, ब्रेक टेस्ट आदी विविध प्रकारची तपासणी करण्यात येते.

यातच रात्रीच्या वेळी ही वाहने इतर वाहनांना स्पष्ट लक्षात यावी यासाठी या वाहनांच्या तिन्ही बाजूला रिफ्लेक्टर लावणे बंधनकारक आहे. अन्यथा, वाहन तपासणीमध्ये ती वाहने घेता येत नाहीत. तसेच, संबंधित वाहनावरती एक हजार रुपयांचा दंड आहे. त्यामुळे आरटीओमध्ये तपासणीस येण्यापूर्वी चालक बाहेरून रिफ्लेक्टर लावून घेतात. त्यासाठी आरटीओ परिसरामध्ये विक्रेते फिरत असतात. त्या विक्रेत्यांकडे २० रुपयांपासून ते ६० रुपयांपर्यंत वेगवेगळ्या प्रकारचे रिफ्लेक्टर विक्रीसाठी असतात.

> आरटीओ परिसरामध्ये कोणी कचरा करू नये, असे वारंवार कळवण्यात आले आहे. कचऱ्याबाबत आम्ही अनेकदा महापालिकेला कळवून साफ करून घेतला आहे. मात्र, त्या ठिकाणी पुन्हा कचरा होतो. विक्रेत्यांनी तो कचरा उचलून स्वतः घेऊन जावा.
>
> - राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड

# इंदापूर न्यायालयासाठी आठ कोटी देणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

## इंदापूर येथे अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर न्यायालयाच्या तिसऱ्या व चौथ्या मजल्याच्या बांधकामासाठी आठ कोटी रक्कम अपेक्षित आहे. सोमवारी (दि. 27) हा जिल्हा न्यायालयाकडे प्रस्ताव सादर होणार आहे. हे प्रस्ताव मान्य करून पाठवले तर, नवीन अर्थसंकल्पात आठ कोटी रुपये उपलब्ध करून देईल, त्याबद्दल कोणतीही तीळ मात्र मनात शंका ठेवू नका, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

इंदापूर येथे अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते ढेरे यांच्या हस्ते तर पुणे जिल्हा सत्र न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश महेंद्र. के. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली, उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संदीप मारणे, न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि. 25) पार पडले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खासदार सुप्रिया सुळे, माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी आमदार यशवंतराव माने यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंदापूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. गिरीश शहा यांनी व वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांचा वृक्ष देऊन सन्मान केला.



### कुठल्या आर्किटेकने वास्तू मंजूर केली?

» न्यायालयाच्या इमारतीतील ग्राउंड फ्लोअरला इतका अंधार आहे की, कोणत्या शहाण्याने, कोणत्या आर्किटेकने ही वास्तू मंजूर केली आहे हे त्यांचे त्यांनाच माहित. दुसऱ्या मजल्यावर चांगला उजेड आहे माझा स्पष्ट स्वभाव असल्याने मी स्पष्टच बोलतो पण न्यायालयाच्या सूचनाचे पालन करण्यात येईल, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले

अजित पवार म्हणाले की, न्यायालयामध्ये प्रॅक्टिस करणाऱ्या वकीलांना नवीन जागेवर 1200 स्क्वेअर फुटाचे नवीन स्ट्रक्चर उभारून द्या, अशी मागणी आपण केल्यामुळे लगेच सोमवारी डीपीडीसीमधून 20 लाख रुपये मंजूर करतो; मात्र हे काम चांगले करा, ते काम पुन्हा शिफ्ट करायचे म्हटले तरी याचा उपयोग व्हावा, असेही आदेश त्यांनी दिले. बऱ्याच दिवसापासून हा कार्यक्रम घ्यायचा असे चालले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विधी व न्याय खाते आहे. ते दाऊसला गेले आहेत तरुण-तरुणींना रोजगार मिळावा या दृष्टीने राज्याला आर्थिक सुबत्ता मिळावी हे पंतप्रधानांचे स्वप्न आहे.

### जिल्ह्यात 153 न्यायाधीश

» जिल्हा हा लोकसंख्येने मोठा आहे.त्यामुळे न्यायदानाच्या कामासाठी 153 न्यायाधीश पुणे जिल्ह्यात आहेत. पुणे शहरात यापैकी 80 न्यायाधीश काम पाहतात. न्यायव्यवस्थेकडून मागणी केलेल्या टॉवरला सरकारच्या माध्यमातून मदत करेल, असे अजित पवार यांनी नमूद केले.

जगामध्ये अर्थकारणाच्या बाबतीमध्ये तिसरा क्रमांक आपला आला पाहिजे. आता आपण पाचव्या क्रमांकावर आहोत, त्याही दृष्टिकोनातून महायुतीचे सरकार काम करत आहे. न्याय लवकर मिळण्यासाठी सुविधा देखील सरकारने लवकर उपलब्ध करून दिल्या पाहिजेत आणि हेच काम महायुतीने हातामध्ये घेतले आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिली.

या कार्यक्रमात बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि माजी आमदार हर्षवर्धन पाटील यांना प्रेक्षकांमध्ये बसावे लागले.

तर उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात सरकारी कार्यक्रमात प्रोटोकॉल पाळला न गेल्याबद्दल सुळेंनी नाराजी व्यक्त केली. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे असून याच मतदारसंघात इंदापूर येते तरीही त्यांच्या नावाचे निमंत्रण या कार्यक्रमात नव्हते. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी त्यांनी मंत्री दत्तात्रय भरणे आणि इतर नेत्यांशी संवाद साधली तर आपली नाराजीही व्यक्त केली.

सुळे यांनी अनेक वेळा राज्यभरातील सरकारी कार्यक्रमांमध्ये विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींना निमंत्रण न दिल्याचा आरोप केला आहे. या कार्यक्रमात देखील त्यांचा सत्कार प्रेक्षकांच्या पंक्तीमध्ये बसून करण्यात आल्याने या उद्घाटनाचा कार्यक्रमाची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# राजगड, तोरणाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करणार : आ. शंकर मांडेकर

## गुंजवणे गावचे सामाजिक कार्यकर्तें यांनी विविध विकास कामांसंदर्भात त्यांची भेट घेतली व परिसराच्या विकासासाठी त्यांना निवेदन देण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

राजगड व तोरणा किल्ल्यासह आजूबाजूच्या परिसरासाठी मोठ्या प्रमाणात भविष्यात निधी देणार असून प्रत्येक गाव खेड्यातील वाड्या व वस्त्यांमधील रस्ते दर्जेदार करणार असल्याचे आमदार शंकर मांडेकर यांनी सांगितले. गुंजवणे गावचे सामाजिक कार्यकर्ते विष्णू मोरे, राजू दरडिगे, विजय दरडिगे, दिनकर दरडिगे, यांनी विविध विकास कामांसंदर्भात त्यांची भेट घेतली व परिसराच्या विकासासाठी त्यांना निवेदन देण्यात आले.



हिंदवी स्वराज्याची प्रथम राजधानी असलेल्या किल्ले राजगड व स्वराज्याचे प्रथम तोरण बांधलेल्या तोरणा किल्ल्याच्या विकासाबरोबरच आजूबाजूच्या परिसरातील गाव खेड्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने नेहमीच मी प्रयत्नशील राहणार असून भविष्यात मोठ्या प्रमाणात या ठिकाणी निधी खर्च करण्यात येणार आहे. त्या संदर्भात संबंधित विभागाचे अधिकारी यांची लवकरच तातडीची बैठक लावून संबंधित विकास कामांबाबतचे प्रस्ताव तयार करण्यास येणार असून जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली वेल्हे तालुक्यातील विकास

> राजगड तालुक्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी असून या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांची संख्या पाहता त्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत असून उपमुख्यमंत्री अजित पवार व आ. शंकर मांडेकर यांच्या नेतृत्वाखाली राजगड (वेल्हा) तालुक्यातील विकास कामांना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे.
>
> - किरण राऊत, अध्यक्ष राजगड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)

कामांना गती येणार असल्याचे यावेळी आमदार शंकर मांडेकर यांनी सांगितले.

राजगड पायथा, गुंजवणे येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या पाहता या ठिकाणी मोठ्या प्रमाणात काम करावे लागणार आहे. येणाऱ्या पर्यटकांना चांगल्या प्रकारच्या सोयी सुविधा मिळाल्या पाहिजेत. पर्यटकांची संख्या वाढल्यास स्थानिक गावांमध्ये व्यवसाय धंद्यांना गती येणार आहे. यातून मोठी रोजगार निर्मिती होणार असल्याने गुंजवणे गावातील विविध विकास कामांना तातडीने निधी दिला जाणार आहे. लवकरच याबाबत जिल्ह्याचे पालकमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे समवेत चर्चा करणार असल्याचे मांडेकर यांनी सांगितले.